Reg. No.E- 413

"Shri Dadapatil Rajale Shikshan Sanstha's"

Date : 8/1/1991

# DADAPATIL RAJALE ART'S, SCIENCE & COMMERCE COLLEGE

Adinathnagar, Tal. Pathardi, Dist. Ahmednagar - 414505

Phone (02428) 245014, 245455

Affiliated to Savitribai Phule Pune University (Id. No. PU/AN/AS/039-1991) NAAC Reaccredited 'B' Grade

Sr. College Code-223, PUNCODE - CAAA016420, Centre No. 110, Jr. S. I. No. J. 12.08.005

E mail : dprc2010@gmail.com

website: www.dprcollege.org.in, www.dprcollege.edu.in

विद्या सर्वस्य भूषणम्



**Dr. Rajdhar Temker** (M.A., Ph.D.)
Principal

**Hon. Appasaheb Dadaba Rajale**
President

Ref. No. 2021-22 / 69

Date : 12/02/ 2022

प्रति,
मा. सहाय्यक आयुक्त
बोल्हेगांव फाटा, एम.आय.डी.सी.रोड,
नगर- मनमाड रोड, अहमदनगर.

---

विषय :- **समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) स्थापन करणे बाबत..**
संदर्भ :- आपले पत्र जा.क्र. सआसक/अन/भासशि/का-१ ४२१/२०२१-२२, दि.४/२/२०२२

महोदय,

वरील विषय व संदर्भीय पत्रानुसार शै. वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) स्थापन करण्याचे सुचित केले होते. तरी त्या अनुषंगाने खालील समिती स्थापन केली आहे.

| अ.नं | समिती सदस्याचे नाव | हुद्दा | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | डॉ.किशोरकुमार गंगाधर गायकवाड | समन्वयक | ९८५०३८७७११ |
| २ | श्री.विजय आसाराम जेधे | कार्यालयीन सहाय्यक | ९४०३५८०७८७ |
| ३ | कु.सुविधा नामदेव गुजर | सदस्य | ९८८१४८९१०७ |
| ४ | कु. प्रतिक्षा अण्णासाहेब तिजोरे | सदस्य | ७४९८२९९७०६ |
| ५ | श्री.राहुल उत्तम माळी | सदस्य | ७९७२४३८५११ |
| ६ | कु.वैष्णवी संजय तेलोरे | सदस्य | ८०८०४४५८५६ |
| ७ | श्री.शुभम राजेंद्र शेलार | सदस्य | ९३७०८४२९५४ |

कळावे,

आपला विश्वासू

(डॉ. आर.जे. टेमकर)
**प्राचार्य**

EBC:368

महाराष्ट्र शासन

# सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहमदनगर

अभिविश्व कॉम्पलेक्स, बोल्हेगांव फाटा, एम.आय.डी.सी, अहमदनगर पिन-४१४१११

फोन नं. ०२४१-२३२९३७८ ई-मेल आयडी- spldswo.nagar@gmail.com, eschol.ahmednagar@gmail.com

जा. क्र. सआसक/अन/भासशि/का-१/४२९/२०२१-२२ दि. ४ /०२/२०२२

प्रति,

प्राचार्य,
सर्व महाविद्यालये,
जिल्हा- अहमदनगर

विषय:- विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "समान संधी केंद्र (Equal Opportunity Center)" स्थापन करण्याबाबत.

संदर्भ:- मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.४५८ दि. २८.०१.२०२२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशीत मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती/फ्रिशीप योजना व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता, व्यवसाय, रोजगार निर्मीतीसाठी मार्गदर्शन संवाद अभियान तसेच युवा संवाद कार्यक्रम सुरू करण्याकरीता महाविद्यालयांमध्ये समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) स्थापन करण्याबाबत मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी निर्देश दिलेले आहेत. व त्याबाबत संदर्भीय पत्रान्वये मा. आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरच्या केंद्राची महाविद्यालयात स्थापना करून त्याबाबतचा अहवाल दि. १५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

समान संधी केंद्राकरीता महाविद्यालयांतील किमान एक प्राध्यापक व त्यांना सहाय्यक म्हणून काही विद्यार्थ्यांची मदत घेण्याबाबत संदर्भीय पत्रात नमुद करण्यात आलेले आहे. (सोबत पत्राची छायांकीत प्रत) सदरचे प्राध्यापक हे समन्वय अधिकारी म्हणून काम पाहतील. तरी सोबतच्या पत्रानुसार समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) स्थापन करून त्याबाबतचा अहवाल दि. १२ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत समन्वय अधिकारी यांच्या संपर्क क्रमांकासह या कार्यालयास सादर करण्यात यावा.

4.2.2022

(राधाकिसन देवढे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, अहमदनगर

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण नाशिक विभाग, नाशिक.



Scanned with Oken Scanner

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१
दूरध्वनी क्र.२०-२६१२७१८६ फॅक्स क्र.०२०-२६१२६६९८ ईमेल

क्र.समकआ/शिक्षण/भासशि/का-४ब/नस्ती क्र. ९१/२०२१/२०२१-२२/२५८ दि. २८/०१/२०२२

प्रति,
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, सर्व.

विषय: विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकास होण्याच्या दृष्टीकोणातून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" स्थापन करणेबाबत...

संदर्भ : १) मा. श्री. इ. झेड. खोब्रागडे भा.प्र.से., सेवानिवृत्त संविधान फौंडेशन,नागपूर यांचे पत्र दिनांक २२ जुलै, २०२१ (ई-मेल दि. २३/७/२०२१)
२) मा.मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगस्ट,२०२१ रोजी झालेली व्हीडीओ कॉन्फरन्स

वरील विषयी संदर्भीय पत्र व मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑगष्ट, २०२१ रोजी झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्स बैठकीच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती /फ्रीशिप इत्यादी योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता, व्यवसाय, रोजगार निर्मितीसाठी - आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन - संवाद अभियान तसेच युवा संवाद - कार्यक्रम सुरु करण्याकरीता महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता "Equal Opportunity Center" स्थापन करणे आवश्यक असल्याचे मा. मंत्री महोदय, यांनी निर्देशित केलेले आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारीत विकासासह त्याचे सर्व मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्वांगिन विकास व व्यवसाय रोजगार नि /र्मितीच्या दृष्टीकोणातून राज्य शासनांनी विशेष उपाययोजना करणेबाबत निर्देशित केले आहे .

त्या अनुरोधाने प्रत्येक महाविद्यालयात त्यांच्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व त्यांना सहाय्यक म्हणून काही विद्यार्थी यांची मदत घेऊन महाविद्यालयात "Equal Opportunity Center" स्थापन करावेत व त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकता, रोजगार प्राप्तीसाठी किंवा उद्योजकता व व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींसह सर्वसमावेशक मार्गदर्शन करण्यांत यावेत. याकरिता आपल्या कार्यालयाच्या अधिनरत असलेल्या जिल्हयातील सर्व उच्च माध्यमिक, कनिष्ट महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये तसेच इतर सर्व शैक्षणिक संस्था व त्यांच्या अधिपत्याखाली येणा-या सर्व महाविद्यालयामध्ये या स्वरुपाची केंद्रे तात्काळ चालू शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याबाबत आपल्यास्तरावरुन लेखी निर्देश देण्यांत यावेत.

तथापी सद्यस्थितीतील कोवीड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये प्रत्यक्षात चालू नसल्याने महाविद्यालयाने किमान सदर "Equal Opportunity Center" ची स्थापना करुन महाविद्यालय निहाय "समन्वय अधिकारी" यांची नियुक्ती करुन Watsapp ग्रुप करुन किंवा इतर समाज प्रसार माध्यमांचा उपयोग करुन संबंधीत महाविद्यालयात प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी समन्वय सुरु करणे आवश्यक आहे.



Scanned with Oken Scanner

तरी उपरोक्त निर्देशित केल्याप्रमाणे आवश्यकता असल्यास आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या व्ही. सी. व्दारे बैठका घेऊन उपरोक्त सर्व सूचना देण्यांत याव्यात व करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दि. १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत आयुक्तालयास अहवाल सादर करावा.

(डॉ. प्रशांत नारनवरे)
आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत:-माहितीस्तवसादर.

१) मा. मंत्री महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे स्विय सहाय्यक.

२) मा. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, सर्व.

Scanned with Oken Scanner